निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
शनिवार
२१ फेब्रुवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३५६ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

# एआयच्या माध्यमातून लोकशाही सशक्त करण्याची संधी -मंत्री ॲड. आशिष शेलार




**नवी दिल्ली/** एआय ही केवळ तंत्रज्ञान क्रांती नसून, ती लोकशाही अधिक सशक्त करण्याची संधी आहे. सुरक्षित आणि स्मार्ट शासनाची गरज लक्षात घेता महाराष्ट्राने एआयचा प्रशासनात प्रभावी वापर केला असल्याचे सांगून महाराष्ट्र या तंत्रज्ञान क्रांतीचे केंद्र बनले असल्याचा विश्वास राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी व्यक्त केला.

नवी दिल्लीतील भारत मंडपम येथे आयोजित एआय इम्पॅक्ट समिट २०२६ मध्ये महाराष्ट्र शासनाच्या वतीने आयोजित 'महा एआय: बिल्डिंग सेफ, सिक्युअर अँड स्मार्ट गव्हर्नन्स' या सत्रात ते बोलत होते. व्यासपीठावर माहिती व तंत्रज्ञान सचिव वीरेंद्र सिंग उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्राने तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्रशासनाला मानवी चेहरा देण्याबरोबरच अधिक वेगवान, पारदर्शक केले असल्याचे सांगून मंत्री ड. शेलार यांनी महाराष्ट्र शासनाने केलेल्या डिजिटल प्रवासाची सविस्तर माहिती दिली. मायक्रोसॉफ्टच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या 'महा क्राईम' प्रकल्पामुळे गुन्हेगारी रोखणे, तपास प्रक्रिया गतिमान करणे आणि पारदर्शकता वाढविणे शक्य झाले. या प्रणालीचे मायक्रोसॉफ्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्या नाडेला यांनीही कौतुक केल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

राज्यात महा आयटी एक प्रगत 'इंटेलिजेंट गव्हर्नमेंट इन्फ्रास्ट्रक्चर' उभारत असून हे क्लाउड-नेटिव्ह आणि एपीआय-आधारित मॉडेल आहे. या माध्यमातून स्मार्ट भरती प्रक्रिया, शहरी स्थानिक संस्थांसाठी एआय-आधारित मालमत्ता मॅपिंग, रिअल-टाइम नागरी डॅशबोर्ड, वाहतूक व पूर व्यवस्थापनासाठी तात्काळ डेटा विश्लेषण, हवामान आणि नागरी तक्रार निवारण प्रणाली हे उपक्रम राबविले जात असल्याचेही मंत्री ड. शेलार यांनी यावेळी सांगितले.

एआयचा वापर प्रशासनाला नागरिकांपासून दूर नेण्यासाठी नव्हे, तर अधिक संवेदनशील, अचूक आणि प्रतिसादक्षम करण्यासाठी केला जात असल्याचेही मंत्री डॉ. शेलार यांनी स्पष्ट केले.

वाढत्या सायबर धोक्यांचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, जसे मानवी शरीरासाठी आरोग्य आवश्यक आहे. तसेच समाजासाठी डिजिटल आरोग्य अनिवार्य आहे. दिशाभूल करणारी माहिती आणि सायबर हल्ल्यां विरोधात मजबूत सायबर सुरक्षा आणि हायब्रिड पडताळणी यंत्रणा उभारण्यास महाराष्ट्र शासन कटिबद्ध आहे. तरी जास्तीत जास्त जागतिक तंत्रज्ञान संस्थानी महाराष्ट्रासोबत भागीदारी करावी असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

या सत्राच्या दुसऱ्या टप्प्यात 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी, प्रवीण परदेशी, महाराष्ट्र सायबर सेलचे अतिरिक्त पोलीस महासंचालक यशस्वी यादव, डॉ.अनुपम चटोपाध्याय, रणजित गोस्वामी, सुरेश सेठी, डॉ अमित कपूर, बिना सरकार, देवरुप धर यांनी तांत्रिक अनुभव मांडले.

प्रवीण परदेशी यांनी सौर ऊर्जा आणि कर्मचारी प्रशिक्षणाचे महत्त्व विषद केले. सरकारी नियमांमधील गुंता सोडवण्यासाठी आणि नागरिकांच्या मदतीसाठी महा जीपीटी हे विशेष एआय मॉडेल विकसित केले जात असल्याचे सांगितले.

यशस्वी यादव यांनी भविष्यातील 'क्वांटम कॉम्प्युटिंग'च्या धोक्यांपासून बँकिंग यंत्रणा सुरक्षित ठेवण्याचे आव्हान आपल्यासमोर असल्याचे सांगून सायबर सुरक्षेसाठी एआयचा वापर करून एक हजार कोटी रुपये आणि ७० मुलींचे प्राण वाचवल्याचे सांगितले.

डॉ. अनुपम चटोपाध्याय यांनी डीपफेक बनावट व्हिडिओ आणि ऑडिओ ओळखण्यातील तांत्रिक आव्हाने स्पष्ट केली. स्थानिक भाषांमध्ये डीपफेक शोधण्यासाठी डेटा तयार करणे आणि खासगी माहिती सुरक्षित ठेवून एआयचा वापर करण्यावर त्यांनी विशेष भर दिला.

प्रशासकीय दृष्टिकोनातून सुरेश सेठी यांनी स्पष्ट केले की, भारताचे डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चर अत्यंत मजबूत आहे. आधार आणि यूपीआयसारख्या व्यासपीठांवर एआयचा स्तर वापरून आपण भविष्यसूचक प्रशासनाकडे वळू शकतो. यामुळे सरकारी योजनांचे लाभ गरजूंपर्यंत मागणी करण्यापूर्वीच पोहोचवता येतील. मात्र हे करताना पारदर्शक, स्पष्टीकरणात्मक आणि मानवी हस्तक्षेपास वाव देणारे एआय तंत्रज्ञान असणे गरजेचे आहे.

रणजित गोस्वामी यांनी टाटा समूहाच्या विचारसरणीनुसार तंत्रज्ञान हे केवळ कार्यक्षमता वाढवण्यासाठी नसून समाजाच्या कल्याणासाठी आणि आनंदासाठी असावे. सर्व सरकारी विभागांनी एकात्मिक डेटाबेस वापरून नागरिकांना अधिक सुलभ सेवा द्याव्यात, अशी भूमिका मांडली.

नैतिकतेच्या मुद्द्यावर बीना सरकार यांनी महिला आणि मुलांच्या सुरक्षेवर विशेष भर दिला. स्मार्ट ग्लासेससारखी उपकरणे परवानगीशिवाय चित्रीकरण करून गोपनीयतेचा भंग करू शकतात. कोणतेही नवीन तंत्रज्ञान किंवा हार्डवेअर बाजारात आणण्यापूर्वी ते ५० टक्के लोकसंख्येला (महिलांना) असुरक्षित तर करत नाही ना, याची पडताळणी 'इंडिया सेफ्टी इन्स्टिट्यूट' कडून होणे अनिवार्य असल्याचे त्यांनी सांगितले.

सत्राच्या अखेरीस, डॉ. अमित कपूर यांनी पायाभूत सुविधांच्या कमतरतेवर बोट ठेवले. महाराष्ट्रातील ८० टक्के कर्मचारी वर्ग अजूनही प्राथमिक कौशल्य स्तरावर असून, त्यांच्या शिक्षणात सुधारणा करणे आवश्यक आहे. तसेच, एआयचा विस्तार टियर-२ आणि टियर-३ शहरांमध्ये करण्यासाठी हाय-स्पीड इंटरनेट आणि डेटा सेंटर्सचे जाळे युद्धपातळीवर विणण्याची गरज त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमाची सुरुवात आयटी विभागाचे सचिव वीरेंद्र सिंह यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. तर या विशेष सत्राचे संचलन देवरुप धर यांनी केले.

## नागरिकाभिमुख महसूल प्रशासनासाठी समन्वय व क्षेत्रीय दौरे वाढवा - विकास खारगे

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी/** नागरिकांना शासनाच्या सेवा अधिक वेगाने, पारदर्शक आणि लोकाभिमुख पद्धतीने मिळाव्यात यासाठी जिल्हा स्तरावरील समन्वय वाढविणे, क्षेत्रीय दौरे वाढविणे आणि नागरिकांशी थेट संवाद साधणे अत्यावश्यक असल्याचे निर्देश महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी दिले.

छत्रपती संभाजीनगर विभागातील महसूल प्रशासनाचे कामकाज, विकास प्रकल्पांची अंमलबजावणी, विविध शासकीय योजनांची प्रगती तसेच नागरिकाभिमुख सेवांची स्थिती यांचा सविस्तर आढावा त्यांनी विभागीय स्तरावर घेतला. ही बैठक छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय आयुक्त कार्यालयात पार पडली.

बैठकीस विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, अप्पर आयुक्त (महसूल) रिता मेत्रेवार, अप्पर आयुक्त विकास (आस्थापना) दादासाहेब वानखेडे, अप्पर विभागीय आयुक्त प्रताप काळे, अप्पर आयुक्त (सामान्य प्रशासन) मंजुषा मिसकर, अप्पर आयुक्त खुशालसिंह आर. परदेशी, सह-आयुक्त रोजगार हमी योजना डॉ. अनंत गव्हाणे, सह आयुक्त (नगर परिषद प्रशासन) देविदास टेकाळे यांच्यासह संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

यावेळी अपर मुख्य सचिव श्री. खारगे म्हणाले की, नागरिकांना शासनाच्या सेवा वेळेत उपलब्ध होणे ही प्रशासनाची प्राथमिक जबाबदारी आहे. महसूल विभागातील प्रलंबित प्रकरणे कमी करून सेवा वितरणाची गती वाढविण्यासोबतच विकास योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यावर भर देणे आवश्यक आहे. तसेच महसूल विभागातील अधिकाऱ्यांनी आठवड्यातून किमान एक दिवस क्षेत्रीय पातळीवर दौरा करून स्थानिक पातळीवरील कामकाजाचा



आढावा घ्यावा व नागरिकांशी संवाद साधावा, असे त्यांनी सांगितले.

'महाराजस्व अभियान' हे अत्यंत महत्त्वाचे अभियान असून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी आणि त्याबाबतचे अहवाल वेळेत ऑनलाईन सादर करावेत, असे निर्देशही त्यांनी दिले.

बैठकीत मराठवाडा विभागातील विविध जिल्ह्यांमधील महसूल विषयक प्रलंबित प्रकरणे, जमीन अभिलेखांचे अद्ययावतीकरण, ई-प्रणालीद्वारे सेवा वितरण, मुख्यमंत्री बळीराजा शेत पाणंद रस्ते योजना, इज ऑफ लिव्हिंग, नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन तसेच शासनाच्या महत्त्वाच्या विकास योजनांची अंमलबजावणी यावर सविस्तर चर्चा करण्यात आली. जमीन नोंदींचे संगणकीकरण, महसूल प्रकरणांचा त्वरित निपटारा आणि शासकीय योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी अधिकाऱ्यांनी सक्रिय भूमिका घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी विभागात सुरू असलेल्या विविध कामकाजाची माहिती दिली. बैठकीस महसूल विभागातील वरिष्ठ अधिकारी व संबंधित विभागांचे अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


## चितळी पुतळी फाटा येथील 'दिपक कृषी सेवा केंद्र'च्या गोदामाला भीषण आग


### गोदामातील खते व कीटकनाशके जळून खाक; शॉर्ट सर्किटमुळे पहाटे आग, ३५ ते ४० लाखांचे नुकसान

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना (प्रतिनिधी) /** जालना तालुक्यातील चितळी पुतळी फाटा येथे असलेल्या दिपक कृषी सेवा केंद्र या कृषी साहित्य विक्री दुकानाच्या गोदामाला आज दि. २० रोजी पहाटेच्या सुमारास भीषण आग लागून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शॉर्ट सर्किटमुळे ही आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.

सदर गोदामामध्ये मोठ्या प्रमाणावर रासायनिक खते, कीटकनाशके तसेच विविध प्रकारची कृषी औषधे साठवून ठेवण्यात आली होती.

पहाटे अचानक धूर निघत असल्याचे लक्षात येताच परिसरातील नागरिकांनी तत्काळ माहिती दिली. काही वेळातच आगीने रौद्ररूप धारण केले आणि संपूर्ण गोदाम पेटून उठले. त्यामुळे गोदामातील सर्व साहित्य जळून खाक झाले.





दुकानाचे मालक दिपक भुतेकर आणि आकाश भुतेकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, आग विझवण्यासाठी तात्काळ प्रयत्न करण्यात आले. मात्र ज्वालांची तीव्रता मोठी असल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान टाळता आले नाही. या आगीत अंदाजे ३५ ते ४० लाख रुपयांचे नुकसान झाल्याचे सांगण्यात येत आहे. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र शेतकऱ्यांसाठी आवश्यक असलेला खत व कीटकनाशकांचा साठा नष्ट झाल्याने परिसरातील शेतकऱ्यांवर त्याचा परिणाम होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

घटनास्थळी स्थानिक पोलीस व महसूल प्रशासनाने भेट देऊन पंचनामा केला असून, घटनेची पुढील चौकशी सुरू आहे. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

## 'मला माफ करा', वडेट्टीवारांनी राहुल गांधींसह काँग्रेस हायकमांडची मागितली माफी; वरिष्ठ म्हणाले 'हे ठीक नाही झालं...'

**चंद्रपुर /** चंद्रपुरात काँग्रेसकडे आपला महापौर बसवण्याची संधी असतानाही दोन गट निर्माण झाल्याने हातची सत्ता गमावली. दुसरीकडे भाजपाने संधी साधून उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेसोबत युती करत आपला महापौर बसवला आहे. दिल्ली दरबारी जाऊनही विजय वडेट्टीवार आणि प्रतिभा धानोरकर यांच्यातील वाद मिटला नाही. धानोरकर -वडेट्टीवार गटातील संघर्ष शिगेला पोहोचला होता. या सर्व घडामोडींमुळे काँग्रेसचे वरिष्ठ नेते नाराज झाले आहेत. सूत्रांच्या माहितीनुसार, काँग्रेसच्या वरिष्ठांनी आज दिल्लीत झालेल्या बैठकीत आपली नाराजी बोलून दाखवली आहे.




**विजय वडेट्टीवारांनी मागितली माफी**

चंद्रपूर महापालिका निवडणुकीत झालेल्या गोंधळाबाबत काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नाराज असल्याची सूत्रांची माहिती आहे. चंद्रपूर महानगर पालिकेत झालेल्या पराभवाबद्दल काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी माफीही मागितली आहे. बैठकीच्या सुरुवातीलाच काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, राहुल गांधी आणि के सी वेणुगोपाल यांची त्यांनी माफी मागितली. मला माफ करा (ख रा डेंीू) म्हणत विजय वडेट्टीवार खेद व्यक्त केला. यावर वरिष्ठांनी हे योग्य झालं नाही आणि ही योग्य वेळ नाही (ढक्खड खड छजढ ऊजछए -छऊ ढक्खड खड छजढ ठखत्रक्ष्ढ ढखचए) असं म्हटल्याचं समजत आहे.

महापौर निवडणुकीवरुन चंद्रपुरात विजय वडेट्टीवार आणि प्रतिभा धानोरकर यांच्यात वर्चस्वाची लढाई सुरु झाली होती. एकमेकांचे नगरसेवक पळविणे त्यांचे जवळजवळ अपहरण करणे इथपर्यंत प्रकार झाले.

काँग्रेसच्या अंतर्गत वर्चस्वाचा वाद जिल्हा, विभाग ,प्रदेश आणि थेट दिल्लीत पोहोचला. त्यात समेट झाल्यानंतर काँग्रेसच्या २७ नगरसेवकांचा एक गट अगदी २ दिवस आधी नोंदला गेला. धानोरकर गटाला महापौरपद तर उपमहापौरपद वडेट्टीवार गटाला असा फॉर्म्युला निश्चित झाला होता. सहकारी पक्षांना स्थायी समिती देण्याचेही निश्चित झाले होते. मात्र सर्व खेळ उबाठा शिवसेना- वंचित आणि अपक्ष यांच्या दहा जणांच्या गटावर अवलंबून होता.

**महाराष्ट्रासंदर्भात पार पडली वेगळी बैठक**

महाराष्ट्राच्या संदर्भात राजधानी दिल्लीत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे आणि राहुल गांधी यांच्या उपस्थितीत वेगळी बैठक पार पडली. बैठकीला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, विजय वड्डेटीवार आणि खासदार रजनी पाटील उपस्थित होत्या. चंद्रपूर महापालिका सत्ता स्थापनेत झालेला गोंधळ, राष्ट्रवादी विलीनीकरणाच्या सुरू असलेल्या चर्चा आणि स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत आलेल्या अपयशासंदर्भात बैठकीत चर्चा झाल्याचं समजत आहे.

**हर्षवर्धन सपकाळ यांनी दावा फेटाळला**

चंद्रपूरमध्ये सगळे नगरसेवक एकसंध राहिले, आमच्यात फूट पडली नाही. मात्र, शिवसेना ठाकरे गटाने थेट भाजपला मतदान केले. त्यांनी ते मतदान केले नसते तर आमचा महापौर बसला असता असं प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटलं आहे.

तसंच बैठकीत चंद्रपूरसंदर्भात चर्चा झाली नाही असा दावा केला आहे. परभणीत उलट परिस्थिती असताना आमच्या नगरसेवकांना विविध पक्षांकडून प्रस्ताव होता. आम्ही त्यांना सोबत घेतले असते तर आमचा महापौर झाला असता. आम्ही परभणीत जी भूमिका घेतली ती भूमिका त्यांनी चंद्रपूर येथे घ्यायला हवी होती असं ते म्हणाले आहेत.

**बहुमत नसल्याने रस्सीखेच**

३४ हा बहुमताचा आकडा कुणालाही मिळालेला नव्हता. त्यामुळेच काँग्रेस आणि भाजपात उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला सोबत घेण्याचा पर्याय उपलब्ध होता. मात्र शिवसेनेने पहिला महापौर आपलाच हवा अशी ठाम भूमिका घेतली होती. त्यावरून गेले सुमारे २० दिवस चर्चा -संवाद यावर सस्पेन्स जारी होता.

भाजपच्या गोटात या मनपा निवडणुकीत २ तंबू बघायला मिळाले. सुधीर मुनगंटीवार आणि किशोर जोरगेवार यांनी प्रत्येक जागा, प्रत्येक पद याबाबत एकमेकांवर कुरघोडी करण्याचा प्रयत्न केला. शेवटी मुख्यमंत्री फडणवीस यांना महसूलमंत्री बावनकुळे यांना चंद्रपुरात पाठवून तात्पुरता समेट घडवावा लागला.

# भारताने कृत्रिम बुद्धिमत्ता म्हणजे एआय या क्षेत्रात आपले स्थान मजबूत........

.....सुरुवातीला या एआय तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी १०,३७१.९२ कोटी रुपये मंजूर करण्यात आले. या द्वारे एआय संपूर्ण भारतासाठी कसे उपयुक्त ठरेल आणि मूलभूत मॉडेल्स आणि डेटा बेसेसाठी एआय तंत्रज्ञान कसे उपयुक्त ठरेल हे या परिषदेतून सांगितले जाईल. विषय सर्वसामान्यांना थोडा कळण्यास अवघड आहे. पण यासाठीच परिषद आहे. एआयचा उपयोग करून सामान्यांचे जीवन कसे सुसह्य करता येईल. लोकसमूह, ग्रह आणि प्रगती ही ती सूत्रे आहेत. ज्यांच्या भोवती परिषदेत काम केले जाईल आणि ही सूत्रे समावेशकता, शाश्वत आणि मानवी केंद्रीत एआय या भोवती रचना तयार करण्यात आली.

लोकसमूह याचा अर्थ मानव केंद्रित एआय असून मानवतावादाची सेवा मानवांचे हक्क आणि सार्वजनिक सेवांप्रती सर्व लोकांना अधिकार तसेच विश्वासाची बांधणी करून देता येतो यावर हे सूत्र आधारलेले आहे. एआय समावेशक आणि मानवी प्रतिष्ठा यांना आणि भारतातील सांस्कृतिक वैविध्याचा आदर राखून जपवणूक करेल असे दुसरे सूत्र आहे. आपला ग्रह पर्यावरणीयदृष्ट्या शाश्वत एआय पद्धतींना अनूकूल राहील असाही उद्देश आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे ऊर्जा सक्षम तंत्रज्ञान आणि जबाबदारीने वापर करून हवामान कृतींना पाठिंबा देईल अशी लवचिकता प्रदान करेल असे तंत्रज्ञान उभारणे असा आहे. भारतात भरणाऱ्या परिषदेची व्याप्ती इतकी मोठी आहे, की भारत मंडपम येथे भरणाऱ्या परिषदेत २.५ लाख प्रतिनिधी उपस्थित राहणार आहे. यात परदेशातून फ्रान्सचे ईमॅन्युएल मॅक्रॉन, ब्राझिलचे लुला डासिल्व्हा, स्पेनचे पंतप्रधान पेड्रो सँचेझ आदींसह उपस्थित रहाणार आहेत आणि परदेशातून तज्ज्ञ या परिषदेसाठी उपस्थित राहणार आहेत. त्यांच्यात सुंदर पिचाई, सेमी कंडक्टर आणि फाईव्ह जी तंत्रज्ञान राबवण्यात महत्त्वाची भूमिका बजावलेले क्रिस्तियानो एमोन आदींचा समावेश आहे.

नवी दिल्लीत सुरू होणारी परिषद ही भारतासाठी अशा प्रकारची पहिलीच परिषद आहे आणि एआय धोक्यांचे कसे व्यवस्थापन करायचे हे शिकवणारी आहे. तसेच नावीन्यपूर्ण संशोधनाला रुळावर व्यवस्थित कसे ठेवायचे याचाही विचार केला जाणार आहे. याची जी चौकट आखली आहे ती एआयचा वापर करताना पक्षपात आणि गैरवापराला आळा घालणे आणि तसे करतानाही भारताचे हेतू जबाबदार एआय व्यवस्थापन करणे यापुरते मर्यादित आहे. या परिषदेतून भारताचा हेतू हा स्पष्ट होतो, की जबाबदार एआय गव्हर्नन्सला आकार देण्याचा आहे. पण यातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा हा आहे, की एआयच्या मार्गदर्शक तत्त्वे जी आहेत ती आरोग्य, शिक्षण, कृषी आणि वित्त यात कशी उपयोगात आणली जातील यावर विचार करण्याचा आहे. कठोर नियंत्रणाशिवाय चौकटीने सात व्यापक सूत्रे निश्चित केली आणि जी धोरणकर्ते आणि उद्योग या दोघांनाही मार्गदर्शन करतील.

यामध्ये विश्वास हा पाया, पीपल फर्स्ट म्हणजे लोक सर्वोपरी, संशोधनापेक्षा संयम महत्त्वाचा आणि समानता आणि जबाबदारी यांचा समावेश आहे. या सूत्रांचा यावर भर आहे, की एआय सिस्टीमनी मानवी निर्णय प्रक्रियेला पाठिंबा दिला पाहिजे आणि तरीही ते पारदर्शक आणि कोणतेही पक्षपात टाळून साध्य करता आले पाहिजे. या परिषदेचे सर्वात प्रमुख वैशिष्ट्य हे आहे, की सध्याच्या कायद्यावरील अवलंबितता. अधिकाऱ्यांनी सांगितले आहे, की अनेक एआयशी संबंधित धोके हे सध्याच्या कायदेशीर चौकटीत समाविष्ट आहेत आणि त्यात आयटी नियमावली आणि गुन्हेगारी कायदे यांचा समावेश आहे.

या मार्गदर्शक तत्वांत असे सांगितले आहे, की एआय डेव्हलपर्स आणि डिप्लॉयर्सकडून काय अपेक्षा आहे. संशोधनाला प्राधान्य देऊन सरकारने केवळ ते एआयचा प्रमुख वापर करणारे नाही तर जबाबदार आणि समावेशक कारभार जो भारताचा २०४७ साली साकार होणारा विकसित भारत दृष्टिकोन साध्य करणारा असेल असे सिद्ध करू पाहत आहे.

एआयचा उपयोग विविध कारणांसाठी होतो आणि हेच या परिषदेचे सार आहे. रोजगार, भाषा, नवीन रोजगार मिळवणे, सार्वजनिक सेवा आणि सामान्य लोकांना लाभप्रद होतील अशा योजना राबवणे यासाठी एआयचा उपयोग कसा करता येईल या दृष्टीने या परिषदेत विचार केला जात आहे. ब्रिटनचे उपपंतप्रधान डेव्हीड लॅमी आणि एआय मंत्री कनिष्क नारायण हे भारतात आलेल्या शिष्ट मंडळात आहेत. त्यांनी सांगितले, की एआयचा उपयोग करून रोजच्या जीवनात कसा सामान्याना लाभ करून देता येईल आणि जगाच्या प्रत्येक कोपऱ्यात एआयचा उपयोग करून डॉक्टर त्वरीत रोगनिदान करतील, शिक्षक शिकवण्यात नवनवीन पद्धती आणतील आणि परिषदा सेवा झटपट देऊन उद्योग नवीन जनरेशनचे रोजगार तयार करतील हे पहाण्यासाठी एआयचा वापर केला जाईल. एआय हे अभूतपूर्व वचन देते की जागतिक आव्हानांना जसे की सार्वजनिक आरोग्य आणि शिक्षण आणि शेतीत उत्पादकता वाढवणे आणि त्यासोबतच मानवी हक्कांचा आदर करणे याबाबत क्रांतिकारी आहे.

एआय पद्धतींचा वापर जर उपयोगकर्ते आणि विकासक यांच्यामार्फत झाला तर समाजाला त्याचा शेवटी प्रचंड लाभ होऊ शकतो. जगात सर्वात जास्त लोकसंख्या असूनही भारतात सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था आहे आणि डिजिटल बाजारपेठांपैकी ती सर्वात वेगाने वाढणारी आहे. मानवता, समावेशक वाढ आणि शाश्वत विकासासाठी एआयचा उपयोग केला पाहिजे असे जे भारताचे इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले ते अगदीच योग्य आहे. ही शिखर परिषद राष्ट्रीय क्षमता, आर्थिक लवचिकता आणि दीर्घकालीन क्षमतांचा सक्षम देश म्हणून भारताची ओळख निश्चित करेल.

अत्यंत झपाट्याने बदलत असलेल्या एआयचे जग समजण्यासाठी आणि एआयचा उद्देश सामान्य जनांपर्यंत पोहोचवणे हा या परिषदेचा हेतू आहे. भारत भरवत असलेल्या या परिषदेची संकल्पना आहे. सर्वजन हिताय सर्वजन सुखाय. हा हेतू सर्व काही सांगून जाणारा आहे. यावेळी परिषदेचा हेतू एआयपासून धोका हा केवळ नाही तर एआयपासून सामान्य लोकांना होणारा फायदा हाही आहे.

# सेवली ग्रामपंचायत कार्यालय येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी



**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना जिल्हा प्रतिनिधी/ गणेश सपकाळ/** सेवली ग्रामपंचायत कार्यालय येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विधीवत पूजा व आरती करण्यात आली.

या प्रसंगी सरपंच विठ्ठल मोरे,उपसरपंच सतीश सदावर्ते, ग्रामविकास अधिकारी विजय राठोड, डॉ. शेख रियाज, प्रा. माजी सरपंच शेख नवीद, समाधान वाघमारे, माजी सरपंच आदिल खान, ग्रामपंचायत सदस्य सौरभ माहोरकर, सचीन साकला, फरहान अन्सारी, सतीश डुमे, खाजा कुरेशी, गणेश मोरे, शेख जफर, संजय खंदारे, ज्ञानदेव झोरे, प्रमोद भालेकर, गणेश तळेकर, दत्ता बर्डे, गणेश मेहेत्रे, किशोर तळेकर, अरुण काकडे, गणेश बर्डे, मुदस्सर खान, गणेश जावळे,श्रावण चव्हाण, सय्यद वसीम,जरीन खान आदी मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संवाद हा नात्याचा पाया असतो

नातेसंबंध म्हणजे दोन व्यक्तींमधील बंधन. हे बंधन प्रेम, आपुलकी, जबाबदारी, अपेक्षा आणि समर्पण यावर उभं असतं. पण या सगळ्याच्या मुळाशी जर काही असेल, तर तो म्हणजे संवाद. संवाद हा नात्याचा पाया आहे. संवादाच्या अभावामुळे कित्येक सुंदर नाती विस्कटून जातात, तर संवाद योग्य पद्धतीने झाल्यास कोणत्याही अडचणींवर मात करता येते. कोणत्याही नात्यात विश्वास टिकवण्यासाठी आणि एकमेकांना समजून घेण्यासाठी संवाद आवश्यक असतो.

जेव्हा पती व पत्नी ही माणसं प्रामाणिक आणि गंभीरपणे संवाद साधू शकतात, तेव्हा ते एकमेकांचे सर्वोत्तम मानसशास्त्रज्ञ ठरू शकतात. कारण मानसशास्त्र हे मन आणि वर्तन याचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. एका व्यक्तीला दुस-याच्या मनातील भावना, विचार, भीती, स्वप्नं आणि असुरक्षितता समजून घेणं गरजेचं असतं. हे समजून घेण्यासाठी मोठ्या प्रमाणावर आत्मपरीक्षण आणि संवेदनशीलता लागते. त्यासाठी खुलेपणाने आणि प्रामाणिकपणे संवाद साधण्याची तयारी असावी लागते.

कित्येक वेळा लोकं नातेसंबंधांच्या गुंतागुंतीबद्दल तक्रार करतात. संबंध फार क्लिष्ट झालेत, तो मला समजून घेत नाही, ती कायम काही ना काही तक्रार करत असते अशा अनेक तक्रारी ऐकायला मिळतात. पण खरा प्रश्न हा असतो की, आपण एकमेकांशी स्पष्ट आणि मोकळेपणाने बोलतो का? एका नात्यात संवादाचा अर्थ फक्त बोलणे एवढाच नसतो तर ऐकणे, समजून घेणे, भावनांचा सन्मान करणे आणि उत्तरदायित्व स्वीकारणे देखील तितकेच महत्त्वाचे असते. ब-याचदा आपण आपले मुद्दे मांडतो, पण समोरच्या व्यक्तीचे ऐकत नाही. हेच नात्यातील संघर्षाचे मूळ असते.

ज्यावेळेस नात्यांमधे संवाद कमी होतो, त्यावेळी दुरावा निर्माण होतो. समोरच्याला काय वाटते हे विचारण्याऐवजी आपण अंदाज लावतो. तो बदलला आहे, ती आता पूर्वीसारखी वागत नाही अशा निष्कर्षांवर येतो. पण हे खरे आहे का? हे समजून घेण्यासाठी आपण मोकळेपणाने आणि विनासंकोच संवाद साधतो का? एकमेकांना वेळ न देणे, संवाद टाळणे, अपु-या माहितीवरून निष्कर्ष काढणे हे सर्व नात्यातील कटूता वाढवते. अनेकदा लोकं भांडण करताना आरोप-प्रत्यारोप करतात. पण जर दोघांनी शांतपणे एकमेकांचे म्हणणे ऐकले, तर हा दुरावा मिटू शकतो.

कधी कधी लोकं नात्यातील संवाद टाळतात कारण त्यांना वाटतं की, जर मी खरं बोललो तर समोरचा दुखावला जाईल किंवा यावर चर्चा केल्याने काही उपयोग नाही पण हे चुकीचे आहे. नात्यात प्रामाणिकता हवी असेल, तर आपण आपल्या भावना व्यक्त करायला पाहिजे. आपल्याला काय हवे आहे, हे स्पष्ट सांगितलं पाहिजे. मला तुझ्याकडून वेळ हवा आहे. माझ्या भावना समजून घेण्याची तुझी इच्छा आहे का? माझ्यासाठी काय महत्त्वाचे आहे, ते तुला सांगू इच्छितो आपण समोरच्याकडून काय अपेक्षा करता हे स्पष्ट सांगितलं पाहिजे. मी तुझ्याकडून अधिक सहकार्याची अपेक्षा करतो. माझ्या निर्णयांचा आदर करावा, अशी माझी इच्छा आहे. असं स्पष्ट बोलायला हवं.

आपल्या मनातील ख-या भावना लपवून न ठेवता बोललं पाहिजे. जर एखाद्या व्यक्तीला काही त्रास होत असेल, पण ती ते बोलत नसेल तर समोरचा कसा समजून घेणार? अजून तरी मनातील ओळखणारे कुठलंही स्कॅनिंग अस्तित्वात आलं नाही. नात्यात अनेक समस्या असू शकतात. विश्वासघात, मतभेद, आर्थिक प्रश्न, मानसिक तणाव, कौटुंबिक जबाबदा-या इत्यादी. त्यातून कधीही परिस्थिती चिघळू शकते. भांडणाच्या वेळी किंवा तणावाखाली असताना संवाद करणे टाळलं, तर पुढे संवाद टिकून राहतो.

वैयक्तिक आयुष्यात पती-पत्नी दोघंही अनेकदा भांडतात. एक दोनदा पत्नी टोकाचा राग अनुभवतात. पण प्रत्येक वेळेस वाद झाला, भांडणं झालं तरी बोलणं टाकायचं नाही. भांडणाच्या वेळी विषय वेगळं वळण घेऊन कायमचा संवाद संपवू शकतो. त्यामुळे जेव्हा कधी वातावरण निवळेल तेव्हा शांततेत संवाद केल्यास तो अधिक प्रभावी ठरतो. विश्वास हा नात्याचा गाभा आहे आणि विश्वास दृढ करण्यासाठी प्रामाणिक संवाद आवश्यक असतो. जर तुम्ही नेहमी खरे बोलत असाल, समोरच्याची फसवणूक करत नसाल तर तुमच्या नात्यात एक वेगळाच घट्टपणा येतो. विश्वासघात झाल्यास संवाद हा तो दुरुस्त करण्याचा मार्ग असतो. कुणालाही पूर्णपणे समजून घेणे सहज शक्य नसते. पण संवादाच्या माध्यमातून त्या अंतरावर विजय मिळवता येतो.

नातेसंबंध टिकवण्यासाठी महागड्या भेटवस्तू, मोठ्या योजना किंवा अविश्रांत प्रयत्न करण्याची गरज नसते. गरज असते ती फक्त प्रामाणिक आणि खुले संभाषण करण्याची. त्यामुळे कितीही वादविवाद झाले तरी संवाद शक्य तितका जोडून ठेवायचा प्रयत्न केला पाहिजे. जेव्हा संवाद योग्यरित्या होतो, तेव्हा कोणताही वाद मिटू शकतो. नातं टिकू शकतं, फुलू शकतं आणि अधिक सशक्त बनू शकतं. त्यामुळे संवादाला पर्याय नाही. यासाठी बोलत रहा, हसत रहा आणि नातं जपत रहा.

**शब्दस्पर्शी-सुनील शिरपुरे**
**कमळवेल्ली,यवतमाळ**

# भारतात आयटी क्षेत्राचा विस्तार वेगाने.......

भारतात आयटी क्षेत्राचा विस्तार वेगाने झाला. भारतातील या क्षेत्राची गेल्या पंचवीस वर्षांमधली प्रगती जुन्या-जाणत्यांनाही चकीत करणारी आहे. या क्षेत्राने दिलेल्या संधींचा फायदा घेत भारतीय तरुणाईने यशाची नवी शिखरे सर केलीच, पण समृद्धीही मिळवली. आज हे भारताच्या प्रगतीच्या प्रवासातले महत्त्वाचे क्षेत्र ठरते आहे.

देशाच्या अर्थकारणात या क्षेत्राची महत्त्वाची भूमिका आहे. कोणतेही उत्पादन न देता सेवेच्या बळावर हे क्षेत्र प्रगती करत आहे. अर्थात हार्डवेअर क्षेत्राचाही या ना त्या प्रकारे संबंध येत असल्याने एकूणच आयटी आणि संगणक क्षेत्र देशात हातात हात घालून प्रगती करत आहेत. त्यामुळेच या क्षेत्रातील घडामोडी, बदलत्या सरकारी तरतुदी, अमेरिकेसारख्या भल्या मोठ्या देशाचा या क्षेत्राच्या अर्थकारणात असणारा सहभाग महत्वाचा ठरतो. किंबहुना, अमेरिकेत सर्दी झाली तरी भारतात हुडहुडी भरत, असा प्रकार अनुभवायला मिळतो. असे अनेक घटक तपासत, समजून घेत आणि त्यांचा प्रभाव अनुभवत भारत या क्षेत्रातील वाटचाल सूकर करत असतो. गेले काही दिवस अमेरिका आणि भारताचे सातत्याने बदलत, वर-खाली होत असलेले संबंध आयटी क्षेत्रात तरंग उमटवत आहेत.

कदाचित म्हणूनच व्हिसा किंवा नागरिकत्व देण्याच्या अमेरिकेच्या धोरणाबरोबरच भारतातील आर्थिक धुरीण या क्षेत्राच्या प्रगतीकडे कसे बघतात, त्याच्या समोर असलेल्या आव्हानांचा मागोवा कसा घेतात हे बघणे महत्वाचे ठरते. अमेरिकेत डोनाल्ड ट्रंप अध्यक्षपदी विराजमान झाल्यापासून हे क्षेत्र काही विक्षिप्त निर्णयांना आणि तरतुदींना सामोरे जात आहेच, पण सातत्यपूर्ण बदलही अनुभवत आहे. त्याचेच प्रतिबिंब ताज्या अर्थसंकल्पामध्ये पहायला मिळाले.

केंद्रीय अर्थसंकल्प भारताच्या आर्थिक धोरणाचे प्रतीक असतो. माहिती तंत्रज्ञान अर्थात आयटी क्षेत्र हे भारताच्या जीडीपीमध्ये मोठे योगदान देणारे क्षेत्र असल्याने आयटीशी संबंधितांच्या अर्थमंत्र्यांकडून नेहमीच मोठ्या अपेक्षा असतात. भारताची अर्थव्यवस्था वेगाने बदलत असताना माहिती तंत्रज्ञान म्हणजेच आयटी क्षेत्र त्या बदलाचे प्रमुख इंजिन ठरले आहे.

१९९०च्या दशकात सुरू झालेला संगणकीकरणाचा प्रवास आज कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाउड कम्प्युटिंग, सायबर सुरक्षा, डेटा ॲनलिटिक्स आणि डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधांपर्यंत पोहोचला आहे. या पार्श्वभूमीवर २०२६-२७ साठी सादर करण्यात आलेले केंद्रीय अंदाजपत्रक आयटी क्षेत्रासाठी अत्यंत महत्त्वाचे ठरले. हे अंदाजपत्रक केवळ आर्थिक आकड्यांपुरते मर्यादित न राहता भारताच्या डिजिटल भवितव्याची दिशा ठरवणार आहे, असे म्हणणे वावगे ठरू नये. २०२६ च्या अंदाजपत्रकाचा मूलभूत उद्देश 'विकसित भारत' या संकल्पनेभोवती फिरतो. आर्थिक वाढ, रोजगारनिर्मिती, गुंतवणूक वाढवणे आणि तंत्रज्ञानाच्या साहाय्याने प्रशासन अधिक कार्यक्षम करणे हे या अंदाजपत्रकाचे प्रमुख स्तंभ आहेत. सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे आयटी क्षेत्र या सर्व उद्दिष्टांचा केंद्रबिंदू असल्याने धोरणात्मक पातळीवर महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. या अंदाजपत्रकातील एक महत्त्वाचा बदल म्हणजे आयटी आणि आयटी-संबंधित सेवांचे एकत्रीकरण.

सॉफ्टवेअर सेवा, आयटी-एनेबल्ड सर्व्हिसेस, ज्ञानाधारित प्रक्रिया सेवा आणि कराराधारित संशोधन या सर्व सेवा एका एकसमान 'माहिती तंत्रज्ञान सेवा' या वर्गाखाली आणण्यात आल्या आहेत. यामुळे कर नियमांमध्ये स्पष्टता येत, कंपन्यांवरील अनुपालनाचा ताण कमी होतो आणि उद्योगासाठी एक स्थिर, पूर्वानुमान करता येणारे वातावरण निर्माण होते. विशेषतः लहान आणि मध्यम आयटी कंपन्यांना याचा मोठा फायदा होणार आहे.

ताज्या अर्थसंकल्पामध्ये डिजिटल पायाभूत सुविधांवर विशेष भर देण्यात आला आहे. डेटा सेंटर्स, क्लाउड सेवा आणि उच्च क्षमतेचे नेटवर्क हा आधुनिक डिजिटल अर्थव्यवस्थेचा कणा आहे.

परदेशी क्लाउड कंपन्यांना भारतातील डेटा सेंटर्स वापरून जागतिक ग्राहकांना सेवा देण्यासाठी २०४७ पर्यंत 'टॅक्स हॉलिडे' जाहीर करण्यात आला आहे; भारतीय ग्राहकांसाठी स्थानिक रिसेलरद्वारे सेवा द्यावी लागेल. संबंधित डेटा सेंटर प्रदात्यांसाठी १५ टक्के खर्चावर सेफ हार्बर मार्जिन उपलब्ध आहे. भारताला जागतिक डेटा हब बनवण्याच्या दृष्टीने डेटा सेंटर्ससाठी करसवलती, दीर्घकालीन धोरणात्मक पाठबळ आणि गुंतवणुकीस पोषक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न या अंदाजपत्रकात दिसून येतो.

यामुळे परदेशी तसेच देशांतर्गत गुंतवणूक वाढून आयटी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होण्याची शक्यता आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान हा अंदाजपत्रकाचा आणखी एक महत्त्वाचा पैलू आहे. एआय, मशीन लर्निंग, रोबोटिक्स आणि सायबर सुरक्षेसारख्या क्षेत्रांमध्ये संशोधन, नवोन्मेष आणि कौशल्य विकासासाठी सरकारी पाठबळ देण्याचे संकेत मिळतात. आयटी क्षेत्र आता केवळ सेवा पुरवठादार न राहता नवकल्पनांचा स्रोत बनत आहे.

स्टार्टअप्स, संशोधन संस्था आणि उद्योग यांच्यातील सहकार्यामुळे भारत जागतिक स्तरावर तंत्रज्ञानातील नेतृत्व भूमिका बजावू शकतो. मानव संसाधन विकास हा आयटी क्षेत्राचा कणा आहे. यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये डिजिटल कौशल्य विकासावर दिलेला भर विशेष उल्लेखनीय आहे.

आयटी क्षेत्राचा प्रभाव केवळ आर्थिक मर्यादेत न राहता प्रशासन, शिक्षण, आरोग्य आणि सामाजिक समावेशनापर्यंत विस्तारला आहे. डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, ई-गव्हर्नन्स, ऑनलाइन शिक्षण आणि टेलिमेडिसिन यासारख्या उपक्रमांमुळे सामान्य नागरिकांचे जीवन सुलभ होत आहे. अंदाजपत्रक २०२६ या डिजिटल परिवर्तनाला गती देण्याचा प्रयत्न करते.

यामुळे पारदर्शकता, कार्यक्षमता आणि समावेशक विकास साध्य होऊ शकतो. तथापि, या संधींसोबतच काही आव्हानेही आहेत. जागतिक आर्थिक अनिश्चितता, तंत्रज्ञानात झपाट्याने होणारे बदल आणि कौशल्यातील तफावत याचा सामना आयटी क्षेत्राला करावा लागणार आहे. अंदाजपत्रकाने दिशा दिली असली तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी, धोरणांची सातत्यपूर्ण अंमलबजावणी आणि उद्योग-शिक्षण-संशोधन यांच्यातील समन्वय अत्यावश्यक आहे. एकूणच, यंदाचा अर्थसंकल्प आयटी क्षेत्रासाठी सकारात्मक आणि दूरदृष्टीपूर्ण ठरतो.

कर सुलभीकरण, डिजिटल पायाभूत सुविधांवरील भर, एआय आणि नवोन्मेषाला चालना तसेच कौशल्य विकासावर लक्ष यामुळे आयटी क्षेत्र भारताच्या आर्थिक आणि सामाजिक परिवर्तनात आणखी महत्त्वाची भूमिका बजावेल. योग्य अंमलबजावणी आणि सातत्यपूर्ण धोरणात्मक पाठबळ मिळाल्यास आयटी क्षेत्र भारताला 'विकसित राष्ट्र' बनवण्याच्या प्रवासात निर्णायक योगदान देईल, अशी आशा बाळगता येते.

# अपर मुख्य सचिव विकास खारगे यांच्या महसूल विभागाच्या कार्यालयांना भेटी व पाहणी

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी/** राज्याचे अपर मुख्य सचिव (महसूल) विकास खारगे यांनी आज छत्रपती संभाजीनगर येथे महसूल विभागाशी संबंधित सर्व कार्यालयांना भेटी देऊन पाहणी केली व सविस्तर आढावा घेतला.

मराठवाडा महसूल प्रबोधिनी, भूमिअभिलेख प्रशिक्षण केंद्र, उपअधीक्षक भूमिअभिलेख, उपसंचालक भूमिअभिलेख, महसूल नोंदणी व मुद्रांक विभाग, नगररचना विभाग तसेच जिल्हाधिकारी कार्यालय येथे श्री.खारगे यांनी आज भेटी दिल्या.

यावेळी अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकुणे, उपसंचालक किशोर जाधव, उपअधीक्षक भूमिअभिलेख डॉ. विजय वीर, उपविभागीय अधिकारी व्यंकट राठोड, नोंदणी विभागाचे उपमहानिरीक्षक विजय भालेराव, सहनिबंधक विवेक गांगुर्डे, सहनिबंधक जालना रामेश्वर रोडगे, भूमिअभिलेख प्रशिक्षण केंद्राचे निर्देशक अविनाश शिंगणे तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.





बैठकी दरम्यान सर्व कार्यालय प्रमुखांना महसूल प्रकरणे निर्धारित कालमर्यादेत निकाली काढण्याचे निर्देश दिले.

नागरिकांना पारदर्शक व वेळेत सेवा मिळावी यासाठी ई-ऑफिस व ऑनलाइन प्रणालीचा प्रभावी वापर करण्यावर भर देण्यात आला.

भूमिअभिलेख विभागास भेट देताना विविध प्रलंबित प्रकरणे, नकाशे अद्ययावत करणे, ई-मोजणी, डिजिटल रेकॉर्ड व्यवस्थापन तसेच नागरिकांना देण्यात येणाऱ्या सेवांचा सविस्तर आढावा घेण्यात आला. भूमि अभिलेख प्रशिक्षण केंद्राच्या भेटीदरम्यान नवीन भरती कर्मचाऱ्यांसाठी नियमित व अद्ययावत प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे, डिजिटल सर्व्हे, ड्रोन मॅपिंग व ई-नकाशा प्रणालीसंदर्भात विशेष कार्यशाळा आयोजित करणे तसेच प्रशिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी तांत्रिक साधनसामग्री उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या. उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करताना प्रलंबित मोजणी प्रकरणे निश्चित कालमर्यादेत निकाली काढण्याचे निर्देश देण्यात आले. फेरमोजणी व सीमांकन प्रकरणात पारदर्शकता राखावी तसेच नागरिकांच्या तक्रारींचे तत्काळ निराकरण करण्यासाठी विशेष पथक कार्यान्वित करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

तसेच उपसंचालक भूमि अभिलेख कार्यालयास मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यांच्या कामकाजाचा नियमित आढावा घेऊन प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करावा, डिजिटल नोंदींची पडताळणी करून अद्ययावत माहिती प्रणालीत नोंद करावी व शासकीय जमिनींचे नकाशे आणि अभिलेख सुरक्षित व संगणकीकृत स्वरूपात जतन करावेत, असे निर्देश खारगे यांनी दिले.

# अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी परदेशी शिक्षण शिष्यवृत्ती योजना; ४० विद्यार्थ्यांना लाभ

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी/** महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागामार्फत अनुसूचित जमातीच्या गुणवंत विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदवी तसेच पीएचडी अभ्यासक्रमांसाठी परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये प्रवेश घेतलेल्या किंवा प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

या योजनेअंतर्गत परदेशातील विद्यापीठाचे डरींर्शीी टड थीश्रव ठरपज्ञळपस २०० पर्यंत असणे आवश्यक आहे. विहित निकषानुसार पात्र विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास ही मर्यादा क्रमाने ३०० पर्यंत ग्राह्य धरली जाईल. निवड पूर्णपणे मेरीटच्या आधारे करण्यात येणार असून एकूण ४० विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्तीचा लाभ दिला जाणार आहे.

**पात्रतेचे प्रमुख निकष**

अर्जदार विद्यार्थी महाराष्ट्र राज्यातील अनुसूचित जमातीचा असावा व सक्षम प्राधिकाऱ्याचे जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये परदेशातील मान्यताप्राप्त संस्थेत प्रवेश घेतलेला किंवा प्रवेशासाठी पात्र असलेला उमेदवार असावा.

उमेदवाराच्या कुटुंबाचे तसेच उमेदवार नोकरी करत असल्यास त्याचे स्वतःचे उत्पन्न धरून मागील आर्थिक वर्ष (२०२५-२६) मधील एकत्रित वार्षिक कौटुंबिक उत्पन्न ८ लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे.

पात्र विद्यार्थी उपलब्ध न झाल्यास ही मर्यादा १० लाख रुपयांपर्यंत शिथिल केली जाईल.

योजनेच्या सविस्तर अटी, पात्रता, वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, लाभ व निवड प्रक्रिया याबाबतची माहिती आदिवासी विकास विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

इच्छुक उमेदवारांनी https://fs.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करून आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत.

ऑनलाईन अर्जाव्यतिरिक्त इतर कोणत्याही माध्यमातून पाठविलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

अर्ज प्रक्रियेबाबतची सर्व माहिती अर्जदारांना त्यांच्या अर्जात नमूद केलेल्या ई-मेलद्वारे कळविण्यात येईल, असे एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, छत्रपती संभाजीनगरच्या प्रकल्प अधिकारी चेतना मोरे यांनी कळविले आहे.

# आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन



**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी/** 'दर्पण' कार आद्यमराठी पत्रकार आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या जयंतीनिमित्त आज जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांना अभिवादन करण्यात आले.

जिल्हाधिकारी कार्यालयात त्यांचे प्रतिमापूजन करुन माल्यार्पण करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

# महसूल विभागाचा अपर मुख्य सचिव विकास खारगे यांच्याकडून कामकाजाचा आढावा

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी/** राज्याचे महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालय येथे जिल्ह्यातील महसूल विभागाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला.

या आढावा बैठकीस विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकुणे, निवासी उपजिल्हाधिकारी जर्नाधन विधाते, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) एकनाथ बंगाळे, उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) सुचित्रा शिंदे, उपजिल्हाधिकारी (रोजगार हमी योजना) रुपेश शिंगारे, उपविभागीय अधिकारी पैठण-फुलंब्री निलम बाफना, उपविभागीय अधिकारी व्यंकट राठोड, खनिकर्म अधिकारी दिनेश झांपले, तहसीलदार छत्रपती संभाजीनगर शिवानंद बिडवे तसेच संबंधित विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील सेतू सुविधा केंद्र येथे प्रत्यक्ष पाहणी दरम्यान सामान्य नागरिकांना शासनाने निर्धारित केलेल्या माफक दरात व वेळेत सेवा उपलब्ध करून देण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच 'आपले सरकार' पोर्टलद्वारे नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन वेळेत मिळावे, असे निर्देश श्री. खारगे यांनी दिले.

गायरान व शासन मालकीच्या जमिनीवरील अतिक्रमणे त्वरीत कमी करण्यासाठी महसूल विभाग, जिल्हा परिषद, महावितरण व संबंधित विभागांनी समन्वयाने बैठक घेऊन प्रभावी कार्यवाही करावी, अशा सूचना देण्यात आल्या. तसेच गौण खनिज व रेतीचे अवैध उत्खनन रोखण्यासाठी कठोर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.



भूसंपादन प्रक्रियेत सामान्य नागरिकांना योग्य मोबदला व लाभ मिळावा, घरकुल योजना, पाझर तलाव, पाणंद रस्ते, वर्ग-२ जमीन वर्ग-१ करणे तसेच राज्यातील महत्त्वाकांक्षी रस्ते व रेल्वे प्रकल्पांकरिता आवश्यक जमीन अधिग्रहण प्रक्रिया गतीने पूर्ण करावी, असेही निर्देश देण्यात आले.

महसूल विभागाने शंभर टक्के ई-शासन प्रणालीचा अवलंब करावा, जिल्हाधिकारी ते गावपातळीवरील कोतवालांपर्यंत समन्वय ठेवून कामाचे प्रभावी नियोजन करावे व मार्च अखेरीस महसुली वसुली पूर्ण करण्यासाठी प्रयत्न करावेत, असे बैठकीदरम्यान सुचविण्यात आले.

# आखातवाडा येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या सात दिवसीय विशेष कॅम्पचा समारोप

**आत्ताच एक्सप्रेस**
**पैठण प्रतिनिधी /बबन उदावंत /** पैठण तालुक्यातील आखातवाडा येथे प्रतिष्ठान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या सात दिवसीय विशेष कॅम्पमध्ये विविध सामाजिक उपक्रम राबवून विविध मान्यवरांसह ग्राम पंचायत सदस्य कल्याण पोकळे यांचे अत्यंत मोलाचे मार्गदर्शन लाभून या कॅम्पचा निरोप समारोप समारंभ अत्यंत आनंदी वातावरणात संपन्न झाला.

अखतवाडा येथील राष्ट्रीय सेवा योजनेच्या समारोप कार्यक्रम प्रसंगी प्रतिष्ठान महाविद्यालयाच्या राज्यशास्त्र विभागाचे डॉ. उमाकांत राठोड यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करतांना रासेयो ही का अमलात आली तसेच महात्मा गांधी,गाडगेबाबा यांचे कार्याबाबत माहिती देवून आजच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून कार्य करणे गरजेचे आहे असे सांगितले.तसेच या कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा महाविद्यालयाचे प्रा. डॉ. शिवानंद सोनकांबळे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून सहभागी



झालेल्या सरपंच,उपसरपंच, ग्रामसेवक, शाळेचे मुख्याध्यापक यांच्यासह विद्यार्थी व गावकऱ्यांचे आभार मानत सर्वांना शुभेच्छा दिल्या.यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. सुभाष राठोड यांनी विशेष कॅम्पच्या सात दिवसाचा अहवाल सादर केला.

यावेळी अनेक विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त करत व्यसनमुक्तीपर उत्कृष्ट नाटिका सादर केली.सदर कार्यक्रमात बेस्ट व्हॅलेंटर साक्षी ससाने व विशाल बारे यांना देण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ. विजयकुमार वैराटे यांनी तर आभार डॉ.महानंदा राऊत यांनी केले.समारोप स्टाफ सेक्रेटरी डॉ. रमाकांत तिडके, जि.प. प्रा. शाळेचे शिक्षक प्रल्हाद पाखरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आला.

यावेळी डॉ.माजिद शेख,डॉ. दीपक भुसारे,डॉ.किरण गायकवाड,डॉ.अर्जुन मोरे,डॉ. ममताराम करे,डॉ.वसंत झेंडे डॉ. हंसराज जाधव,डॉ.सुवर्णा पाटील,डॉ.अमोल मस्के, डॉ. स्वाती पाटील इत्यादींची उपस्थिती होती.सदर कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली.

# शेकटा येथे जि. प. प्रा. शा. शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली....

**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर प्रतिनिधी :-** गंगापूर तालुक्यातील शेकटा येथे जिल्हा परिषद शाळेत छत्रपती शिवाजी महाराज जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली दरम्यान छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ राजा नव्हते, तर ते महाराष्ट्राचे ऊर्जास्थान आहेत. आजच्या पिढीने केवळ उत्सवापुरते मर्यादित न राहता, शिवरायांच्या जाज्वल्य विचारांचा वारसा प्रत्यक्ष जीवनात उतरवण्याचा संकल्प करावा, छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून इ. १

**चिमुकल्या शिवरायांनी जिंकली मने !**

कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक संतोष जाधव यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. पूर्वी बैलगाडीतून निघणाऱ्या मिरवणुका आज आधुनिक वाहनांपर्यंत पोहोचल्या आहेत, काळ बदलला तरी निष्ठा तीच आहे, असे ते म्हणाले. विशेषतः कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या चिमुकल्यांना शिवरायांच्या वेशभूषेत पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. अशा संस्कारांतूनच उद्याची प्रबळ पिढी घडेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला



ली ते ४ थी च्या मुलांनी गीतगायन, भाषण, लेझीम, नृत्य या कलागुणदर्शनाने उपस्थितांची मने जिंकली. बाजार समितीचे संचालक संतोष जाधव तसेच शा. व्य. स. अध्यक्ष शगीर शेख व माजी अध्यक्ष .अशोक जाधव यांच्या हस्ते शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शिक्षिका श्रीम. झेलाटे मिलानी, मुख्याध्यापिका श्रीम. शेवाळे वर्षाराणी यांनी परिश्रम घेतले.

कार्यक्रमासाठी माजी केंद्र प्रमुख . ए. एम. शेख, ग्रामपंचायत सदस्य भाऊसाहेब गायकवाड, युवराज जाधव अब्बास शेख,नारायण राजपुत, रफिक पटेल, नाशिर पठाण, रईस पटेल , हाकिम पटेल , खंडु शिंदे धनराज जाधव , अनिल जाधव, मुस्ताक शेख , ईम्रान पठाण ,अनिल शिंदे शाहेद पटेल, नरोडे मामासह पालक व विद्यार्थी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते...

# विक्रमशिला प्राथमिक निवासी शाळेत शिवजयंती उत्साहात साजरी

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना जिल्हा प्रतिनिधी/ गणेश सपकाळ /** अंबड शहरातील विक्रमशिला प्राथमिक निवासी शाळेत छत्रपती शिवाजी महाराज ३९६ वी जयंती मोठ्या उत्साहात व भक्तिभावाने साजरी करण्यात आली.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रोटरी क्लब अंबडचे अध्यक्ष तथा पार्थ हॉस्पिटलचे संचालक मा.डॉ.लक्ष्मण सावंत सर उपस्थित होते.

कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक म्हणून शिवव्याख्याते मा.अमोल पाष्टे सर, जिल्हाकार्याध्यक्ष संभाजी ब्रिगेडचे मा.विनोद जाधव सर उपस्थित होते. तसेच अष्टविनायक मोटार ड्रायव्हिंग स्कूलचे संचालक मा.गणेश बोबडे सर,नगरसेवक तथा आरोग्य व स्वच्छता सभापती न.प.अंबड मा.सचिन खरात,मा.नगरसेवक कुमारभाऊ रूपवते,पत्रकार तथा दैनिक महाराष्ट्र सर्वांचा चे कार्यकारी संपादक मा.हरिभाऊ गिराम,दैनिक कृष्णनिति अंबड तालुका प्रतिनिधी मा.गोविंद खरात,जयभवानी मंगलकार्यालयाचे संचालक मा.उमेशसेठ भवर तसेच आदी मान्यवरांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.संस्थेचे संचालक श्री.संजय जाधव सर यांनी प्रास्ताविकातून शिवजयंतीचे महत्त्व अधोरेखित केले. शाळेतील विद्यार्थी सोहम भुकेले याने प्रभावी भाषण करून उपस्थितांची दाद मिळवली. मा.अमोल पाष्टे सर व मा.विनोद जाधव सर यांनी विद्यार्थ्यांना शिवचरित्र,स्वराज्य स्थापनेचा इतिहास आणि महाराजांचे आदर्श जीवनकार्य याविषयी सखोल मार्गदर्शन केले.त्यांच्या प्रेरणादायी विचारांनी विद्यार्थ्यांमध्ये देशभक्तीची भावना जागृत झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक श्री. योगेश हरणे सर यांनी केले,तर आभार प्रदर्शन शिक्षक श्री.प्रमोद मस्के सर यांनी केले.

यावेळी श्री.संजय जाधव सर,श्री.प्रमोद मस्के सर, श्री.योगेश हरणे सर,सौ.शितल जाधव मॅडम,सौ. योगिता शिंदे मॅडम तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी




व पालक उपस्थित होते.

शिवजयंतीचा हा कार्यक्रम उत्साह, प्रेरणा आणि देशभक्तीच्या वातावरणात संपन्न झाला.

# अतिफा अहजर मन्सुरी या सात वर्षीय चिमुकल्याने रमजान महिन्याचे पहिला उपवास रोजा पुर्ण केला...

**आत्ताच एक्सप्रेस**
**गंगापूर प्रतिनिधी/ फिरोज मन्सुरी/** गंगापूर तालुक्यातील साजापुर येथील अतिफा अहजर मन्सुरी वय ७ वर्षाचा या चिमुकलीने आपल्या जीवनातील रमजान महिन्याचा पहिला रोजा उपवास पूर्ण केल्याबद्दल वडील अजहर मन्सुरी,अजोबा अफसर मन्सुरी ,चुलते इस्माईल मन्सुरी मुजीब मन्सुरी यांच्यासह नातेवाईक मित्र परिवाराने कौतुक करत अभिनंदन केले.



# जालना येथील ड्रायपोर्ट लवकरच कार्यान्वित होणार - माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे

**-ड्रायपोर्ट ची निविदा निघाली, महिनाभरात मालवाहतूक सुरु होणार**
**- तत्कालिन केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांनी जालन्यासाठी खेचून आणलेला देशातील पहिला ड्रायपोर्ट प्रकल्प**
**- मराठवाड्याच्या औद्योगिक व कृषी विकासाला मिळणार चालना**

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना जिल्हा प्रतिनिधी/** देशातील पहिला ड्रायपोर्ट जालना येथे उभारण्याचा निर्णय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पहिल्या कार्यकाळात तत्कालीन भूपृष्ठ वाहतूक मंत्री नितीन गडकरी तसेच माजी केंद्रीय राज्यमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते रावसाहेब दानवे यांच्या पुढाकारातून मंजूर झाला होता. हा प्रकल्प सुरू करण्यासाठी वेगवेगळ्या पातळीवरचे टप्पे जवळपास पूर्ण झाले असून दोन दिवसांपूर्वीच केंद्रीय महामार्ग यंत्रणेमार्फत आलेल्या सहा निविदांपैकी विकास कोल अँड मिनरल्स प्रा.लि. या कंपनीची निविदा स्वीकारल्याने ड्रायपोर्टवरून प्रत्यक्षात आयात निर्यातीस प्रारंभ होऊ शकतो.



दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी ड्रायपोर्टच्या ऑपरेशन्स अँड मॅनेजमेंट संदर्भातील निविदा उघडण्यात आली. त्यामध्ये एल- १ म्हणून नागपूर येथील विकास कोल ण्ड मिनरल्स प्रा. लि. या कंपनीची निवड करण्यात आली आहे. सदरील कंपनी सोबत करार करून आठ दिवसांच्या आत कार्यारंभ आदेश देण्यात येणार असून, त्यानंतर एक ते दोन महिन्यात प्रत्यक्ष मालवाहतूक प्रक्रिया सुरू होईल.

जालना शहरालगत जवळपास चारशे एकर परिसरावर या ड्रायपोर्टची उभारणीचे काम सन २०१६ पासून सुरू झाले. प्रारंभी चारशे एकर जमीन संपादित करून त्याला संरक्षणभिंत बांधण्यात आली. मध्यंतरीच्या काळात रेंगाळलेला हा प्रकल्प ज्येष्ठ नेते रावसाहेब पाटील दानवे यांनी जेएनपीटी अर्थात जवाहरलाल नेहरू पोर्ट स्टच्या अधिकाऱ्यांना जालन्यात बोलावून प्रकल्पाला गती दिली. विशेष म्हणजे कस्टम क्लिअरन्स हा आयात आणि निर्यातीसाठी लागणारा महत्त्वाचा घटक याआधीच मंजूर झालेला आहे. आजघडीला ६४ एकरवर आवश्यक त्या सुविधा उपलब्ध असून जालना तालुक्यातील दिनेगाव ते ड्रायपोर्टपर्यंत स्वतंत्र रेल्वे रूळ अंथरलेले आहेत. आयात-निर्यातीसाठी मालधक्का देखील तयार आहे. मध्यंतरी लोकसभा निवडणुकीच्या पूर्वी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या ड्रायपोर्टचे व्हर्च्युअल उद्घाटन केले होते. त्या कार्यक्रमास केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, रावसाहेब दानवे, आ.अर्जुन खोतकर यांचीही उपस्थिती होती.

असे असले तरी विविध प्रशासकीय प्रक्रियामुळे हा प्रकल्प काही वर्ष प्रलंबित राहिला होता त्यामुळे प्रत्यक्षात या ड्रायपोर्टच्या माध्यमातून मालाची ने आण सुरू झाली नव्हती. त्यासाठी अनेक वेळा निविदा मागविण्यात आल्या. मध्यंतरी जेएनपीटी प्रशासनाकडून हा प्रकल्प केंद्रीय महामार्ग रस्ते विकास मंडळाकडे वर्ग करण्यात आला. याच मंडळाने या निविदा मागविल्या होत्या. दोन दिवसांपूर्वी सहा पैकी विकास कोल अँड मिनरल्स प्रा.लि. यांची निविदा मंजूर झाली असून या कंपनीकडून आता पुढील पंधरा वर्षांसाठी जालन्याचे ड्रायपोर्टचे संचालन करण्याची जबाबदारी राहणार आहे. यापोटी ही कंपनी एमएमएलपी अर्थात मल्टी मॉडेल लॉजेस्टिक पार्क या कंपनीला दरवर्षी एकूण उलाढालीच्या तुलनेत दीड कोटी रूपये देणार आहे. साधारणपणे महिनाभरात या कंपनीला ड्रायपोर्टचे संचालन करण्यासाठीचे प्रशासकीय मान्यता देऊन त्यांच्याकडून बँक गॅरंटी घेण्यात येणार आहे.

हा प्रकल्प केवळ जालना जिल्ह्यासाठीच नव्हे, तर संपूर्ण मराठवाडा, विदर्भ आणि उत्तर महाराष्ट्रासाठी विकासाचे मोठे पाऊल ठरणार आहे. ड्रायपोर्ट कार्यान्वित झाल्यानंतर राज्यांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील मालवाहतुकीचा खर्च लक्षणीयरीत्या कमी होणार आहे. यामुळे लॉजिस्टिक्स खर्चात बचत होऊन कृषी व औद्योगिक उत्पादनांना स्पर्धात्मक दरात राष्ट्रीय व जागतिक बाजारपेठ उपलब्ध होईल. निर्यात प्रक्रिया सुलभ, जलद आणि खर्चिकदृष्ट्या परवडणारी होणार आहे.

सर्वांगीण प्रगतीकडे वाटचाल... जालना जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीस चालना देणारा हा ड्रायपोर्ट प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यासाठी संबंधित यंत्रणा कार्यरत असून, आगामी काळात जालना राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय व्यापार नकाशावर ठळकपणे स्थान निर्माण करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

प्रत्यक्षात काम सुरू होणार असल्याचा आनंद- माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे

जालन्यात ड्रायपोर्ट सुरू व्हावा म्हणून पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शहा तसेच तत्कालीन केंद्रीय भूपृष्ठमंत्री नितीन गडकरी यांच्याकडे पाठपुरावा केला होता. विशेष म्हणजे जालन्यातील उद्योजकांनी दिल्लीत येऊन जालन्यासह मराठवाडा आणि विदर्भातील उद्योगांना तसेच शेतकऱ्यांना त्यांचा माल आयात निर्यात करण्यासाठी काहीतरी वेगळा प्रकल्प गरजेचा असल्याचे नमूद केले होते. त्यानंतर जालन्यात हा ड्रायपोर्टचा प्रकल्प मंजूर झाला. आज अनेक अडचणींवर मात करून साधारणपणे पुढील महिन्यात निविदा मंजूर केलेल्या विकास कोल अँड मिनरल्स प्रा.लि. कडून प्रत्यक्षात कामाला सुरूवात होईल यात आता शंका राहिली नाही. त्यामुळे रोजगार उपलब्ध होण्यासह मोठ्या कंपन्यांसह शेतकऱ्यांना लाभ होईल याचे समाधान आणि आनंद आपल्याला आहे.

विकासाला गती मिळेल - आशिमा मित्तल

जालना येथील केंद्र सरकारचा अत्यंत महत्त्वपूर्ण प्रकल्प म्हणून ड्रायपोर्टकडे पाहिले जात होते. आपण गेल्या सहा महिन्यांपासून त्याबाबत वरिष्ठ पातळीवर बोलण्यासह प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा केला. आता विकास कोल अँड मिनरल्स प्रा.लि या कंपनीची निविदा मंजूर झाल्याचे कळले आहे. त्यामुळे मोठा आनंद झाला असून जालन्यासह मराठवाडा आणि अन्य जिल्ह्यांना या प्रकल्पामुळे मालाची आयात - निर्यात करण्यास मोठी मदत होणार आहे. - आशिमा मित्तल, जिल्हाधिकारी जालना

उद्योग व शेतीला थेट लाभ..!

जालना व परिसरातील स्टील उद्योग, बियाणे उद्योग तसेच विविध कृषी उत्पादनांना या प्रकल्पाचा थेट फायदा होणार आहे. ड्रायपोर्टमुळे कंटेनराइज्ड मालवाहतूक सुलभ होऊन निर्यात प्रक्रिया स्थानिक पातळीवर पूर्ण करता येईल. कमी खर्चात व जलद गतीने मालाची वाहतूक झाल्याने स्थानिक उद्योगांना इतर राज्यांतील तसेच परदेशातील कंपन्यांशी प्रभावी स्पर्धा करता येणार आहे. शेतकऱ्यांच्या उत्पादनांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेचे दार खुले होणार असून, त्यांना अधिक चांगला दर मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

# अंबड पंचायत समितीचा 'भ्रष्टाचार पॅटर्न'!

**-जिल्हा परिषदेच्या आदेशाला वाटाण्याच्या अक्षता?**
**-दोषी रोजगार सेवकावर कोणाचा वरदहस्त?**
**-महिना उलटला तरी कारवाईचा पत्ता नाही;**
**अधिकाऱ्यांच्या भूमिकेवर संशयाची सुई!**

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना (प्रतिनिधी)** अंबड पंचायत समितीमधील भ्रष्टाचाराचे वाभाडे काढणारा एक धक्कादायक प्रकार समोर आला असून, प्रशासकीय यंत्रणा किती निर्ढावलेली आहे याचा प्रत्यय येत आहे. जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दोषी ग्राम रोजगार सेवकावर कडक कारवाईचे आणि वसुलीचे आदेश देऊन महिना उलटला, तरीही अंबड पंचायत समितीचे प्रशासन कुंभकर्णी झोपेत असल्याचे चित्र आहे. या दिरंगाईमुळे दोषींना अभय देणारे ते अदृश्य हात कोणाचे? असा संतप्त सवाल आता नागरिक विचारत आहेत.

मग्रारोहयो (MGNREGA) अंतर्गत गट क्रमांक १५३ मधील एका विहिरीच्या कामात शासनाची दिशाभूल करून खोटी माहिती सादर केल्याचा गंभीर ठपका संबंधित ग्राम रोजगार सेवकावर ठेवण्यात आला आहे. या घोटाळ्याची चौकशी झाल्यानंतर मा. उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद जालना यांनी डिसेंबर २०२५ मध्येच स्पष्ट आदेश निर्गमित केले होते.

**आता चेंडू गटविकास अधिकाऱ्यांच्या कोर्टात!**
आता सर्वांचे लक्ष अंबडच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे (BDO) लागले आहे. ते वरिष्ठांच्या आदेशाचे पालन करून दोषींना घरचा रस्ता दाखवतात की तथाकथित 'अर्थपूर्ण' संबंध जपतात? हे येणाऱ्या काळात स्पष्ट होईल.

**प्रशासनाचे 'कागदी' घोडे; आदेश फक्त नावापुरतेच?**

उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुरेंद्र पवार यांनी दिलेल्या लेखी उत्तरांनुसार आणि आदेशानुसार खालील कारवाया अपेक्षित होत्या.**रोजगार सेवक भरत शिंगाडे:** यांना तातडीने कार्यमुक्त करणे.**वसुली:** विहिरीवर झालेला खर्च ७.८०% वार्षिक व्याजासह वसूल करणे.**प्रविण घाडगे** (PTO): तांत्रिक सहाय्यक अधिकारी यांच्यावर निलंबनाची कारवाई.



मात्र, दि. २२ जानेवारी २०२६ रोजी कारवाईचे अंतिम आदेश निघूनही आज महिना उलटला तरी संबंधित रोजगार सेवक अद्यापही पदावर मिरवत आहे. वसुलीची रक्कम तर दूरच, पण साधी नोटीस बजावण्याची तसदीही स्थानिक प्रशासनाने घेतलेली नाही. यावरून जिल्हा परिषदेच्या आदेशांना अंबड पंचायत समितीने केराची टोपली दाखवल्याचे स्पष्ट होत आहे.

**अधिकाऱ्यांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात**

या संपूर्ण प्रकरणात तांत्रिक सहाय्यक अधिकारी (PTO) प्रविण घाडगे, तत्कालीन सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (APO) हरी पवार आणि तत्कालीन उऊएज यांची भूमिका अत्यंत संशयास्पद मानली जात आहे. तांत्रिक बाजू सांभाळणारे आणि अंमलबजावणी करणारे अधिकारीच जर दोषींना **'प्रोटेक्शन'** देत असतील, तर न्याय कोणाकडे मागायचा? अशी चर्चा आता पंचायत समितीच्या गोटात रंगली आहे.

शासनाचे पैसे गिळंकृत करणाऱ्यांवर कारवाई का होत नाही? हा जनतेच्या पैशावर डल्ला आहे. जर तातडीने निलंबन आणि वसुली झाली नाही, तर आम्ही तीव्र आंदोलन करू!
**- स्थानिक ग्रामस्थ व सामाजिक कार्यकर्ते**

**विधानसभेतही घुमणार आवाज?**

या प्रकरणाचे गांभीर्य ओळखून विधानसभेत तारांकित प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. उपमुख्य कार्यकारी अधिकारी सुरेंद्र पवार यांनी लेखी उत्तरात कारवाई झाल्याचे म्हटले असले, तरी प्रत्यक्षात जमिनीवर (Ground Level) कोणतीही हालचाल दिसत नाही. हा केवळ प्रशासकीय निष्काळजीपणा नसून एक मोठा प्रशासकीय गुन्हा आहे. या प्रकरणात आता लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (ACB) किंवा राज्यस्तरीय समितीमार्फत चौकशी करण्याची मागणी जोर धरत आहे.

## भगवान बाबा नगर येथील आसराबाई चौरे यांचे निधन



**आत्ताच एक्सप्रेस**
**आष्टी (प्रतिनिधी)** परतूर तालुक्यातील भगवान बाबा नगर येथील रहिवासी आसराबाई बन्सी चौरे (वय ५६ वर्षे) यांचे शुक्रवारी दुपारी १:०० वाजेच्या सुमारास अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांच्या जाण्याने चौरे कुटुंबावर शोककळा पसरली असून परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

आसराबाई चौरे या मनमिळावू स्वभावाच्या होत्या. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, पाच मुली, सुना आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे. आष्टी ग्रामपंचायतीचे विद्यमान सदस्य प्रवीण चौरे यांच्या त्या मावशी होत.

त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच आष्टी आणि परतूर तालुक्यातील राजकीय, सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींनी त्यांच्या निवास्थानी भेट देऊन सांत्वन केले. त्यांच्या पार्थिवावर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी नातेवाईक, ग्रामस्थ आणि विविध क्षेत्रांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## जिल्हाधिकारी कार्यालयात माजी न्यायमुर्ती संदीप शिंदे यांनी घेतला कुणबी नोंदी व प्रमाणपत्र वाटपाचा आढावा

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना जिल्हा प्रतिनिधी/** कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा या स्वरूपाच्या आढळलेल्या नोंदींच्या आधारे पात्र व्यक्तींना जात प्रमाणपत्रे देण्यासाठी विहित कार्यपद्धती निश्चित करण्याकरिता स्थापन करण्यात आलेल्या समितीची महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. समितीचे अध्यक्ष माजी न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात ही बैठक संपन्न झाली. या बैठकीत न्यायमूर्ती शिंदे यांनी जिल्ह्यातील कुणबी नोंदी शोधण्याच्या मोहिमेचा आणि आतापर्यंत वितरित करण्यात आलेल्या प्रमाणपत्रांचा, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचा सविस्तर आढावा घेतला. तसेच जालना जिल्ह्यातील पात्र लाभार्थ्यांना जात प्रमाणपत्रे देण्याची प्रक्रिया अधिक सुलभ आणि गतिमान करण्याबाबत त्यांनी प्रशासनाला आवश्यक सूचना केल्या.

कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा आढळुन आलेल्या नोंदीच्या आधारे पात्र व्यक्तींना जात प्रमाणपत्र देणेबाबतची कार्यपध्दती विहीत करण्यासाठी गठित समिती अध्यक्ष मा.न्यायमुर्ती संदीप शिंदे (निवृत्त) यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील आढावा बैठकीस जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांच्यासह सर्व उपविभागीय अधिकारी, सर्व तहसीलदार यांची प्रमुख उपस्थिती होती.

जिल्हा प्रशासनाकडून दि.१८ फेब्रुवारी २०२६ अखेर कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा नोंदणी साठी विविध विभागांच्या अभिलेख्यांवरुन २२ लक्ष ७४ हजार ८२ तपासलेल्या नोंदी आहेत यामध्ये कुणबी जातीच्या एकुण ५०२७ नोंदी आढळुन आलेल्या आहेत. यामध्ये महसूल विभाग-२४५५, भुमि अभिलेख विभाग-१८४४, शिक्षण विभाग-९०, जिल्हा उपनिबंधक कार्यालय जालना-४०३, महानगरपालिका (जन्म-मृत्यू नोंदी)-१८५, ग्रामपंचायती (जन्म-मृत्यू नोंदी)-१८५ आणि सेवा अभिलेखे सेवापट- ३ अशा एकुण ५०२७ कुणबी नोंदी आढळुन आलेल्या आहेत. मा .न्या. संदीप शिंदे (निवृत्त) समिती स्थापन झाल्यापासून जालना जिल्ह्यातील सर्व तालुक्यात आढळुन आलेल्या नोंदी व वाटप करण्यात आलेल्या जात प्रमाणपत्रामध्ये जालना नोंदी ४२८ तर जात प्रमाणपत्रे ११५३, बदनापूर नोंदी १०२ आणि जात प्रमाणपत्रे १३१७, अंबड नोंदी २३८ तर जात प्रमाणपत्रे ३१४०, घनसावंगी नोंदी २९ तर जात प्रमाणपत्रे ४९४, भोकरदन नोंदी २७०९ तर जात प्रमाणपत्रे ५८९९, जाफ्राबाद नोंदी ४११ तर जात प्रमाणपत्रे ८८६, परतूर नोंदी तर जात प्रमाणपत्रे २०८८ आणि मंठा नोंदी ४५७ तर जात प्रमाणपत्रे १६८० मिळण्यासाठी अर्ज प्राप्त झाले आहेत. यामध्ये परतूर तालुक्यात १ व मंठा तालुक्यात १८ असे एकुण १९ अर्ज नाकारलेले आहेत तर प्रलंबित अर्ज निरंक आहेत. दि.०२.०९.२०२५ च्या शासन निर्णयानूसार जिल्ह्यातील एकुण १०३३ ग्राम महसूल अधिकारी, सहायक कृषी अधिकारी आणि ग्रामपंचायत अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण घेण्यात आले आहे. दि.०२.०९.२०२५ रोजीच्या शासन निर्णयानूसार हैद्राबाद गॅझेटीअर मधील नोंदी विचारात घेवून कुणबी, किंवा मराठा कुणबी किंवा कुणबी-मराठा जात प्रमाणपत्र वाटपात प्राप्त अर्ज १९३ आणि मान्य केलेले अर्ज ७४ तर नाकारलेले अर्ज ४ आणि प्रलंबित असलेले अर्ज ११५ आहेत. जिल्ह्यात जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे जात प्रमाणपत्र वैधतेसाठी एकुण ११२ अर्ज दाखल झालेले असून पडताळणी समितीने ७४५ प्रमाणपत्र वैध ठरविले आहेत. अवैध २३ अर्ज ठरविले तर इतर कारणांनी निकाली १२३ अर्ज काढले सध्या पडताळणी समितीकडे २३१ अर्ज प्रलंबित आहेत. यात १ ते ९० दिवसातील १८७ तर ९० दिवसाच्यावरील ४४ अर्ज आहेत. अशी माहिती जिल्हा प्रशासनाच्यावतीने यावेळी देण्यात आली.

## पळशी येथे हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती महिलानी केली मोठ्या उत्साहात साजरी

**आत्ताच एक्सप्रेस**
**पळशी प्रतिनिधी/** दि.१९ फेब्रुवारी २०२६ रोजी पळशी तालुका परतुर मैजे पळशी जि. प. प्रा. शाळेच्या प्रांगणात हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला अहिल्या बाई होळकर ग्राम संघाच्या अध्यक्ष शालनबाई मोटे व सचिव संजीवनी मोटे या मान्यवरांच्या हस्ते शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार घालून जिजाऊ वंदना घेण्यात आली.

त्यानंतर बालवर्ग ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर असे भाषणे ,पोवाडे ,गीते, नृत्ये सादरीकरण केली.यामुळे सर्व वातावरण शिवमय झाले . शाळेतील मुलांनी गोष्टी रूपामध्ये शिवरायांचा संपूर्ण इतिहास सादर केला. यावर्षी शिवजयंती नाचून नाहीतर वाचून साजरी करण्यासाठी शिवचरित्रावर सामान्य ज्ञान स्पर्धे तील विजेत्यांना बक्षीस वाटप करण्यात आले. व गुणवंताचा सत्कार केला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्रीमती अनिता वावरे यांनी केले. प्रास्ताविक अविनाश लांबूड सर तर आभार नवनाथ काटे सर यांनी मानले.या कार्यक्रमाचे आयोजन शिवकन्या ग्रुप, शिवमुद्रा ग्रुप पळशी यांनी केले.होते

## धनगर पिंपरी येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे लोकार्पण सोहळा उत्साहात साजरा

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना जिल्हा प्रतिनिधी/** हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त धनगर पिंपरी ता.अंबड जि.जालना येथे दि.१९ फेब्रुवारी रोजी त्यांच्या अश्वारूढ पुतळ्याचे अनावरण बदनापूर विधानसभेचे आमदार लोकनेते श्री नारायणभाऊ कुचे यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले.या ऐतिहासिक लोकार्पण सोहळ्याला ग्रामस्थ,शिवभक्त, सर्व पदाधिकारी व तरुणाई मोठ्या संख्येने उपस्थित होते.शिवरायांचा अश्वारूढ पुतळा हे शौर्य,स्वाभिमान आणि स्वराज्याच्या प्रेरणेचे प्रतीक असून येणाऱ्या पिढ्यांसाठी ते सदैव प्रेरणास्थान ठरेल.छत्रपती शिवाजी महाराजांनी दिलेले धैर्य,न्याय आणि सुशासनाचा आदर्श प्रत्येकाने आचरणात आणावा,असा संदेश यावेळी व्यक्त केला.याप्रसंगी माजी सभापती रमेश भाऊ पैठणे,डॉ राहुल भैय्या डोंगरे,माजी सरपंच प्रल्हाद खांडेकर,ॲडव्होकेट भारत खांडेकर,तंटामुक्ती अध्यक्ष सुनीलभाऊ खांडेकर,संतोष मोढेकर,उपसरपंच विलास भाऊ कचरे,ॲडव्होकेट संदीप नरोडे,भगीरथ खांडेकर,हनुमान खांडेकर,नारायण वरे,कृष्णा पवार,कृष्णा वरे,जनार्दन मुळे,विठ्ठलराव खांडेकर,रामभाऊ कदम,किशोर काळे,भानुदास आरगडे,ग्रामविकास अधिकारी रवींद्र ढवळे,बाळु मुळे,नवनीत कदम,नारायण नरोडे,गजानन आरगडे,राजू माने,प्रकाश ढवळे,प्रदीप इंगळे,चत्रभुज बर्डे,रामेश्वर मिसाळ,सोपान मोढेकर,श्रीनिवास हरणे,महारुद्र खांडेकर व गावातील प्रतिष्ठित



नागरिक,ग्रामपंचायत सदस्य,विविध पाटील,विविध संघटनेचे पदाधिकारी कार्यकारी सोसायटीचे सदस्य,पोलीस यावेळी उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813